शैक्षणिक वर्ष - 2023 - 24

बैठक क्र. 1

Date : 13 | 08 | 2023

मानसशास्त्र विभाग शैक्षणिक वर्ष २०२३ - २४ या वर्षातील प्रथम सत्रातील शैक्षणिक नियोजनासंदर्भात खालील विषयांवर चर्चा करणेसाठी 13 ऑगस्ट २०२३ रोजी सकाळी 11.30 वा. रुम. नं. 40 मध्ये बैठक आयोजित करण्यात आली आहे तरी या बैठकीस आपण उपस्थित रहावे

बैठकीसमोरील विषय -

1) शैक्षणिक वर्ष 2023 - 24 मधील बी.ए. भाग - एक व दोनचा निकाल तयार करणे.
२) विभागीय वेळापत्रक व स्टडी बजेट तयार करणे.
3) नवीन शैक्षणिक धोरणानुसार सुधारित अभ्यासक्रमावर चर्चा करणे.
4) अभ्यासपूरक व अभ्यासक्रमाव्यतिरिक्त उपक्रमांच्या आयोजनाबाबत चर्चा करणे.
5) शैक्षणिक आराखडा निश्चित करणे.
6) आयत्यावेळी आलेल्या विषयांवर चर्चा करणे.

(शिक्का: श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर — मानसशास्त्र विभाग)

विभाग प्रमुख
मानसशास्त्र विभाग
श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर

बैठकीचा इतिवृत्तांत

मानसशास्त्र विभागातील शैक्षणिक वर्ष २०२३ - २४ मधील प्रथम सत्रातील शैक्षणिक नियोजनासंदर्भात चर्चा करणेसाठी बैठक पार पडली. व चर्चेअंती खालील महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आले.

1) बी.ए. भाग - एक व दोन मानसशास्त्र विषयाचा निकाल तयार करून तो IQAC कडे सादर करणेबाबत निर्णय झाला व त्याला मंजुरी मिळाली.
२) शैक्षणिक वर्ष २०२३ - २४ साठी अध्यापनाचे योग्य नियोजन होण्याच्या दृष्टीने विभागीय वेळापत्रक व स्टडी बजेट तयार करणेबाबत चर्चा झाली व निर्णय घेवून मंजुरी देण्यात आली.
3) शैक्षणिक वर्ष २०२३ - २४ पासून बी.ए. भाग - १ साठी नवीन शैक्षणिक धोरणानुसार सुधारित अभ्यासक्रमानुसार अभ्यासपूरक व मूल्यमापन प्रक्रिया यावर चर्चा झाली व निर्णय घेण्यात आला.
4) प्रतिवर्षीप्रमाणे शै. वर्ष २०२३-२४ मध्ये अभ्यासपूरक व अभ्यासक्रम व्यतिरिक्त उपक्रमांचे आयोजन करणेबाबत निर्णय घेण्यात आला व त्याला मंजुरी दिली.
5) शै. वर्ष २०२३ - २४ ची शैक्षणिक प्रक्रिया सुलभ व्हावी या हेतूने शैक्षणिक दिनदर्शिका (Academic Calendar) तयार करणेबाबत निर्णय झाला व त्याला मंजुरी मिळाली.
6) आयत्यावेळी कोणताहि विषय नसल्याने आभार मानून बैठक समाप्त झाली.

(शिक्का: श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर — मानसशास्त्र विभाग)

विभाग प्रमुख
मानसशास्त्र विभाग
श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर

Scanned with OKEN Scanner

बैठक क्र. 2 Date: 16/12/2023

मानसशास्त्र विभाग शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील द्वितीय सत्रातील शैक्षणिक नियोजनासंदर्भात खालील विषयांवर चर्चा करणेसाठी १८ डिसेंबर २०२३ रोजी सकाळी ११.३० वा खोली क्र. ४० मध्ये बैठक आयोजित करण्यात आली आहे. तरी सदर बैठकीसाठी आपण उपस्थित रहावे.

बैठकीसमोरील विषय -

1) बी.ए. भाग-एक (सत्र दोन) तसेच बी.ए. भाग-दोन (सत्र-तीन) अभ्यासक्रमावर चर्चा करणे.
2) माहे. जानेवारीमध्ये शिवाजी विद्यापीठ अग्रणी महाविद्यालय योजना अंतर्गत एकदिवसीय कार्यशाळा आयोजनाबाबत चर्चा करणे.
3) द्वितीय सत्रामध्ये विद्यापीठ परीक्षा अंतर्गत मूल्यमापन प्रक्रियेवर चर्चा करणे.
4) आयत्यावेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.

(स्वाक्षरी)
विभाग प्रमुख
मानसशास्त्र विभाग
श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर

(शिक्का: श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर — मानसशास्त्र विभाग)

बैठकीचे इतिवृत्त -

मानसशास्त्र विभागातील शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील द्वितीय सत्रातील शैक्षणिक नियोजनासंदर्भात चर्चा करणेसाठी बैठक आयोजित करण्यात आली होती. चर्चेअंती खालील महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आले.

1) बी.ए. भाग एक व दोन (सत्र-दोन व चार) नुसार प्रस्तावित अभ्यासक्रम वेळेत पूर्ण करणेबाबत चर्चा झाली व निर्णय घेऊन मंजुरी देण्यात आली.
2) मानसशास्त्र विभागाच्यावतीने शिवाजी विद्यापीठ अग्रणी महाविद्यालय योजनेअंतर्गत मंजूर झालेल्या कार्यशाळेचे आयोजन ३ जानेवारी २०२४ करून विविध महाविद्यालयातील मानसशास्त्र विभागातील प्राध्यापक व विद्यार्थी यांना समाविष्ट होणेबाबत आवाहन करणे तसेच कार्यशाळेच्या यशस्वीतेच्या दृष्टीने सर्वतोपरी प्रयत्न करणेबाबत चर्चा होऊन निर्णय झाला व त्याला मंजुरी दिली.
3) शिवाजी विद्यापीठ द्वितीय सत्रातील (सत्र दोन व चार) परीक्षांसाठी आवश्यक अंतर्गत मूल्यमापन प्रक्रिया निश्चित करून बी.ए. भाग-एक साठी असाइनमेंट आणि बी.ए. भाग-दोन साठी तोंडी परीक्षा घेणेबाबत निर्णय झाला व त्याला मंजुरी मिळाली.
4) आयत्यावेळी कोणताही विषय नसल्याने आभार मानून बैठक समाप्त झाली.

(स्वाक्षरी)
विभाग प्रमुख
मानसशास्त्र विभाग
श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर

(शिक्का: श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर — मानसशास्त्र विभाग)

Scanned with OKEN Scanner